**<u>नियमीत फौजदारी खटला क्र.१०६/२०१८</u>**
**<u>निशाणी क्र.७९</u>**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०७)
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांव :– रमाकांत महादु बबीलवार,
माझे वय :– ४१ वर्ष,
माझा व्यवसाय :– पोलीस हवालदार,
माझा रहिवास :– पोलीस उपअधिक्षक कार्यालय, पुर्णा, जि.परभणी.

**<u>सरतपास</u>**

<u>अभियोगपक्षा करिता श्री.पी.एन.सोळंके, विशेष सहाय्यक सरकारी वकील</u>

०१. दिनांक ०५/०२/२०१८ रोजी मी पोलीस नाईक म्हणून चुडावा पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना चुडावा, धनगर टाकळी व पिंपळा रस्त्यावर वसमत फाटा या मार्गे रात्री गस्तीवर होतो. त्यादिवशी माझ्यासोबत पोलीस हवालदार प्रल्हा बोकारे होते. आम्ही वसमत फाटा येथुन परत येत असताना एक संशयीत वाहन महिंद्रा पिकअप येताना दिसले. त्या वाहनात काय आहे त्याची पाहणी केली. त्यात आम्हाला वायरचे अर्धवट असलेले बंडल आढळुन आले. त्यामुळे आम्ही आरोपीची चौकशी केली असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे आम्ही आरोपीला मुद्देमालासह पोलीस ठाण्यात हजर केले. आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी क्र.१ सकाळच्या सत्रात न्यायालयात हजर होता. (आरोपींतर्फे प्रकरण तहकुबीचा अर्ज निशाणी ७५ नामंजुर)

... सरतपास पुर्ण.

**उलटतपास**

<u>आरोपींतर्फे उलटतपास नाही. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालवण्यात येते.</u>

**<u>... फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

(**व्ही.आर.गटकळ**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.०२, पुर्णा.

दिनांक:१०/०८/२०२६

<u>नियमीत फौजदारी खटला क्र.१०६/२०१८</u>

<u>निशाणी क्र.७६</u>

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०६)

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | |
|---|---|
| माझे नांव | :– राजाभाऊ भाऊराव चव्हाण, |
| माझे वय | :– ६० वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– सेवानिवृत्त्, |
| माझा रहिवास | :– गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी. |

**<u>सरतपास</u>**

<u>अभियोगपक्षा करिता श्री.पी.एन.सोळंके, विशेष सहाय्यक सरकारी वकील</u>

०१. मी फिर्यादीला पाहिल्यास ओळखु शकतो. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकत नाही. दिनांक ०६/०२/२०१८ रोजी मी पोलीस ठाणे चुडावा येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी महेश अजय संघी फिर्याद देण्यासाठी आला होता. त्याने केबल चोरी बाबत फिर्याद दिली होती. त्याने सांगीतल्यानुसार फिर्याद लिहुन घेतली होती. त्यावर माझी वफिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७७** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर दाखवण्यात आली, त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी ७८** देण्यात येते. आरोपी हजर (आरोपींतर्फे प्रकरण तहकुबीचा अर्ज निशाणी ७५ नामंजुर)

... सरतपास पुर्ण.

**उलटतपास**

<u>आरोपींतर्फे उलटतपास नाही. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालवण्यात येते.</u>

**<u>... फेरतपास नाही</u>.** श्रवणोत्तर स्वीकृत,

(**व्ही.आर.गटकळ**)

दिनांक:१०/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

**न्यायालय क्र.०२, पुर्णा.**